गडचिरोल  दिनांक २१/०७/२०१७

## *कुरुमपल्ली ग्रामस्थांनी आपल्या जवळील भरमार जमा करुन केला “नक्षल सप्ताह” चा जाहिर निषेध......*

गडचिरोली जिल्हयातील अहेरी तालुक्यामधील नक्षलवादाने प्रभावित असलेल्या उप पोलीस स्टेशन दामरंचा येथे दिनांक २१/०७/२०१७ रोजी मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली, डॉ. अभिनव देशमुख साो., मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. राजा रामासामी साो. व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री. अण्णासाहेब जाधव सर यांचे मार्गदर्शनाखाली उप पोलीस स्टेशन दामरंचा चे प्रभारी अधिकारी श्री. अनिल लवटे सर, पोउपनि. अभिजित भोसले, गणेश मोरे सर व उप पोस्टाचे सर्व कर्मचारी यांनी पोलीस स्टेशन दामरंचा हद्दीतील जनतेला ग्रामभेट, एलआरपी, एसआरपी दरम्यान भरमार बंदुका जमा करुन नक्षल सप्ताह निषेद करण्याचे आव्हान केले होते त्याला प्रतिसाद देत उप पोलीस स्टेशन दामरंचा हद्दीतील नक्षलदृष्टया अतिसंवेदनशील कुरुमपल्ली गावातील ग्रामस्थांनी नक्षलवादा विषयीचा तिव्र रोष बघायला मिळाला सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन आपल्या जवळ असलेले सर्व भरमार बंदुका उप पोलीस स्टेशन दामरंचा पोलीसांकडे सुपुर्द करुन नक्षल्याच्या शहिद सप्ताहाचा तिव्र निषेध केला.

तसेच गेल्या कित्येक वर्षापासून आमच्या गावामध्ये नक्षल मुळेच सरपंच नसल्याने त्यांना येत असलेल्या अडचणी बाबत रोश व्यक्त केला.


स्थापना.१९९०.
उप पोलीस स्टेशन
ता.अहेरी
दामरंचा
जि.गडचिरोली